


दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.
दैनिक वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
** पात्रता **
१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
संपर्क-९४२२६६००७७
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २३फेब्रुवारी २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक १९१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# बीडची लोकसभा निवडणूक लढवणार?
# पंकजा मुंडेंच्या उत्तराची राजकीय वर्तुळात चर्चा

*राष्ट्रवादी आता भाजपसोबत असल्याने भाजप नेत्या पंकजा मुंडे कोणत्या मतदारसंघातून लढणार? याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.*



**वादळवार्ता/**
देशभरात आता लोकसभेच्या निवडणूकांची जोरदार तयारी होत असलेली पाहायला मिळत आहे. सत्ताधारी भाजपने यंदाच्या लोकसभेत 400 चा आकडा पार करण्याचा पक्का निर्धार केलाय. तर राज्यातही जागावाटपाआधी बैठकांचं सत्र सुरू झालं आहे. राष्ट्रवादी आणि भाजप एकत्र आल्यामुळे आता पंकजा मुंडे विधानसभेला कोणत्या मतदारसंघातून लढणार हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आगामी लोकसभेसाठी त्या बीडमधून लढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अशातच यावर पंकजा मुंडे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

**येणार काळ महिलांचा, सत्याच राजकारण करतील- पंकजा मुंडे**
राजकारणात येणाऱ्या महिलांसाठी येणारा काळ चांगला आहे कारण येत्या काळात महिलाच या स्पष्ट आणि सत्याचा राजकारण करतील असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत.. तर येणाऱ्या काळात एकट्याची ताकद जगाला दाखवून द्यावी लागेल, असंही पंकजा मुंडे म्हणाल्या.

**काय म्हणाल्या पंकजा मुंडे?**
लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या बूथ रचना केली जात आहे आणि या कामाला कार्यकर्त्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. 2014 आणि 19 मध्ये याच कार्यकर्त्यांनी माझ्या बाजूने चांगलं काम केलं होतं त्यामुळे उमेदवार कोण असेल हे येणाऱ्या काळात निश्चित होईल, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.
राज्यामध्ये सध्या मराठा आरक्षण ओबीसी आरक्षण आणि धनगर आरक्षणाचा प्रश्न पेटलेला आहे. याचा येणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर पाहिजे तेवढ्या प्रमाणात धोकादायक परिणाम होणार नाही. मराठा समाजाने ठरवावे किती आरक्षण हवं आहे की नाही यावर अनेकदा मी माझी भूमिका स्पष्ट केल्याचं म्हणत पंकजा मुंडेंनी अधिक बोलणं टाळलं.

## उन्हाची चाहूल लागताच केज तालुक्यामध्ये चोहीकडे घुमू लागला रसवंतीगृहातील घुंगराचा खुळखुळ आवाज.

**वादळवार्ता/केज**
केज तालुक्यासह परिसरातील वातावरणाच्या बदलामुळे यंदा फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात कडक उन्हाळा जाणवू लागला आहे, शहरात व रस्त्याच्या कडेला सध्या छोटे मोठे व्यावसायीक रसवंतीगृह सुरू झाले आहेत. रसवंतीगृहात ग्राहकाची मागणी एक ग्लास द्या, जास्त बर्फ टाकु नका,हे सर्रास वाक्य रसवंती चालकाच्या कानावर पडणारे वाक्य आहे,या वर्षी उन्हाळ्याची चाहूल लवकरच म्हणजे फेब्रुवारी महिन्यातच जाणवु लागली आहे,या मुळे तालुक्यात रसवंतीगृहे लवकरच सुरुवात झाली आहेत, उन्हाळ्यात उसाचा ताजा रस पिणयाचा अनंद वेगळाच आसतो, बाल गोपाळा पासुन ते वयोवृध्द माणसापर्यंत हवा हवा सा वाटणारा उन्हाळ्यात ताजा उसाचा रस आता शहरी भागा सह ग्रामीण भागात मिळु लागला आहे ,उसाचा रस प्यायल्याने शरीरातील पाण्याची कमतरता भरून निघते व डिहायड्रेशन पासुन बचाव होतो,शरीराला भरपूर ऊर्जा मिळते. उन्हाळ्याची चाहूल लागली की गावात, शहरात, रस्त्याच्या कडेला रसवंतीगृहाच्या घुंगराचा खुळखुळ आवाज घुमु लागतो रस्त्यावरून येणाऱ्या व जाणाऱ्या लोकांना हा आवाज जनु कांही खुनावु लागतो उन्हाळ्यात सर्वजण कुटुंबासह लिंबु, आद्रक घातलेल्या गावरान उसाच्या रसाचा मनसोक्त आस्वाद घेताना दिसत आहेत, उन्हाळ्यात कमी भांडवलात, पण हंगामी करता येणारा आणि चांगले उत्पन्न देणारा हा व्यावसाय आहे. उन्हाळ्यामुळे अंगाची चांगलीच लाहीलाही होत असते प्रत्येक जण थंड पाण्यास पहीली पसंत देतो त्यातुनच आरोग्यासाठी उत्तम पेय म्हणून उसाचा रसाला सर्वजण पसंती देतात ही रसवंतीगृह उन्हाळ्यात हजारो लोकांची तहान भागवतात इतर कोणत्याही शीत पेया पेक्षा उसाचा रस आरोग्यदायी असल्याने रसवंतीगृह ला उन्हाळ्यात सर्वाधिक पसंती असते फेब्रुवारी महिन्यापासून रसवंती, व्यावसाय सुरू होतो यानंतर मार्च, एप्रिल ,में, आणि जुन मध्ये या व्यावसायातुन लाखो रुपये ची उलाढाल होते , रसवंती व्यावसायातुन रसवंती मालक काम करणारे मजुर तसेच उस उत्पादक शेतकऱ्यांचा मोठा फायदा होतो.

आम्ही गेल्या पाच वर्षांपासून रसवंतीचा धंदा करतोत केज आणि युसुफ वडगाव या दोन ठिकाणी आमचे रसवंतीगृह आहेत, आम्ही आमच्या शेतातील गावरान उस ,रोजची रोज ताजा व स्वच्छ उस रसवंतीगृहात अनतोत आणि तोजा व स्वच्छ उसाचा रस ग्राहकांना देतोत त्यामुळे आमच्या संस्कार रसवंतीगृहाला गृहकांची पंसती आहे.

**राहुल डोंगरे**
**रसवंतीगृह चालक केज**

## कृषी व पशुसंवर्धन सभापतींचे शिलोत्तर येथे शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबीर.

**दैनिक वादळ वार्ता**
**विक्रमगड/तुषार पाटील**
जिल्हा परिषद पालघर व पंचायत समिती वाडा यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी शिलोत्तर ,ता वाडा येथे दोन दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले होते त्यावेळी पशुसंवर्धन सभापती संदीपजी पावडे उपस्थित राहून शेतकऱ्यांना पशुपालन करुन शेतीचा विकास करण्याचा सल्ला दिला त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ घेतला पाहिजे तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सेंद्रिय शेती करावी असे आवाहन त्यांनी केले.
त्यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा परिषद महिला व बालविकास सभापती रोहीणीताई शेलार, जिल्हा परिषद सदस्य भक्ती वलटे,मिताली बागुल,वाडा पंचायत समिती सभापती अस्मिता लहांगे, कृषी भूषण सन्मानीत प्रगतशील शेतकरी अनिल पाटील, गटविकास अधिकारी खताळ साहेब, तसेच कृषी विभागासाठी निगडित असलेले इतर सर्व शासकीय अधिकारी उपस्थित होते.




## माजलगावात मूकनायकाचा दैदिप्यमान सोहळा

माजलगाव / प्रतिनिधी
महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने दि .२३ शुक्रवार रोजी होणाऱ्या मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्याला ओम प्रकाशजी शेटे, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धीरज भैया देशमुख, माजी आमदार गुरुनाथ कुरुडे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे ओम प्रकाशजी शेटे यांची उपस्थिती लाभणार आहे,अशी माहिती आयोजक बाळासाहेब आडागळे यांनी दिली. महाराष्ट्र पत्रकार संघाच्या मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळा, शुक्रवार दि २३फेब्रुवारी रोजी मॉ.वैष्णवी मंगल कार्यालयात सकाळी १२:०० वाजता रंगणार आहे. मुकनायक पुरस्कारासाठी निर्भीड पत्रकार, मराठी महाराष्ट्र न्यूज चॅनेल चे संपादक संग्राम धन्वे संपादक मिलिंद मुजमुले यांना प्रदान करण्यात येणार आहे.माजलगाव भुषण पुरस्कार महावीर मस्के, शेतकरी कामगार पक्षाचे नेते अँड नारायण गोले पाटील, पात्रुड चे उपसरपंच घनश्याम भुतडा, डॉक्टर युवराज कोल्हे, संजीवनी मल्टीस्टेटची चेअरमन संजय सपाटे, माजलगाव नगरपालिकेचे कार्यालय अध्यक्षक गणेश डोंगरे, तलाठी संघर्षकुमार ओवे, सोन्नाथडी गावच्या सरपंच सो.वंदना केरबा तपसे, इंडिया स्टील चे उद्योजक शेख सरताज, अंगणवाडी सेविका वंदना उघडे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याला बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे,माजी आमदार मोहनराव काका सोळंके,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,आ.भाजप नेते रमेशराव आडसकर, मोहनराव जगताप, रिपाइंचे युवा प्रदेश अध्यक्ष पप्पू जी कागदे, एम आय एम चे बीड जिल्हाध्यक्ष अँड . शेख शफिक भाऊ, डी .पी. आय.चे अजिंक्य चांदणे, शेकापचे भाई मोहन गुंड ,लोकपत्रकार भागवत तावरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत असून या कार्यक्रमाला माजलगाव तालुक्यातील व शहरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन महाराष्ट्र पत्रकार संघाच्यावतीने आयोजक, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब आडागळे, तालुकाध्यक्ष वाजेद पठाण, बालासाहेब उफाडे, शेख मुजफ्फर, अनंत घडसिंगे, विजय कापसे, विष्णुपंत नाईकनवरे , धैर्यशिल ढगे यांनी केले आहे.

## शिवरायांचे विचार आचरणात आणणे गरजेचे –जेथलिया पत्रकारांच्या वतिने शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळवार्ता**
माजलगाव : ( प्रतिनिधी) छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखी वेशभूषा आणि केशभूषा ठेवण्याऐवजी त्यांचे विचार आचरणात आणण्याची आज गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे अध्यक्ष व माहेश्वरी सभा अध्यक्ष उमेशकुमार जेथलिया यांनी पत्रकारांनी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनी केले.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंती निमित्ताने माजलगाव पत्रकारांच्या वतीने महाराजांना वंदन करण्यासाठी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन येथील शासकीय विश्रामगृह माजलगाव येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार किशोर प्रधान , किशन भदर्गे होते. या प्रसंगी पुढे बोलताना उमेशकुमार जेथलिया यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले कि , छ.शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या मावळ्यांना सोबत घेऊन रयतेचे राज्य निर्माण केले. परंतु आज प्रत्येक माणूस आपापल्या जातीचाच विचार करतो आहे आणि त्यामुळेच जातीवाद वाढत असल्याचे दिसून येत आहे . छ. शिवाजी महाराजांची जयंती साजरी करीत असतांना त्यांनी दिलेली शिकवण व सर्व जाती धर्मातील लोकांना समानतेची वागणूक देऊन त्यांचे हक्क अधिकार मिळवून देणे व माणसा माणसात प्रेम आपुलकी समता निर्माण करणे हेच खरे महाराजांना अभिवादन होईल. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित किशन भदर्गे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला सुद्धा धक्का लागणार नाही याची काळजी त्यांचे सैनिक घेत होते. परंतु आजचे राज्यकर्ते मात्र शेतकऱ्यांच्या व जनतेच्या हिताचे रक्षण करण्यात अपयशी ठरत आहेत.प्रसंगी महाकवी वामनदादा कर्डक यांनी लिहिलेल्या छ.शिवाजी महाराजां वरील गीताच्या काही ओळी सांगितल्या " शिवरायांच्या राज्यामध्ये मुळीच नव्हती वाहनं आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान " या प्रसंगी पत्रकार परमेश्वर सोळंके , अमर साळवे , राजरत्न डोंगरे , विजय मस्के , दर्शन डोंगरे , विजय डावरे , शेख मुजफ्फर , अनंता घडशिंगे सह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# युसूफवडगाव आणि बोरीसावरगाव पेट्रोल पंप लुटणारी कोयता गँग स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

*कोयता व कत्तीने हल्ला करून लुटणारी टोळी केज तालुक्यातील*

**दैनिक वादळ वार्ता गौतम बचुटे/केज**
मागील आठवड्यात अवघ्या २५ मिनिटात केज तालुक्यातील युसुफवडगाव आणि बोरीसावरगाव येथील पेट्रोल पंपावर सशस्त्र दरोडा टाकून फरार झालेली कोयता गँग स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतली आहे. केज तालुक्यात दि. १६ फेब्रुवारी रोजी ११:२३ वा. च्या सुमारास युसुफवडगाव येथील शिवरुद्र चोपणे यांच्या शुभम पेट्रोलियम सर्व्हिसेस या पेट्रोल पंपावर दोन मोटार सायकल वरून आलेल्या चौघांनी पेट्रोल पंपाच्या कार्यालयाचा काचेचा दरवाजा फोडून मॅनेजरला धारदार तीक्ष्ण हत्यारांचा धाक दाखवून पंपावरील कर्मचाऱ्यांना मारहाण केली. दहशत निर्माण करून करून कपाटातील २५ हजार ३०० रु. रोख रक्कम घेऊन पळून गेले होते. त्या नंतर पुढे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या बोरीसावरगाव येथील विश्वनाथ सोमवंशी यांच्या सोमवंशी पेट्रोल पंपावरही शस्त्राचा धाक दाखवून कर्मचाऱ्यांना मारहाण करून ३ लाख ३४ हजार ७७० रु ची रक्कम घेऊन मोटार सायकली वरून पळून गेले होते. या प्रकरणी युसुफवडगाव पोलिस ठाण्यात पेट्रोल पंपावच्या मॅनेजरच्या फिर्यादी वरून अज्ञात दरोडेखोरां विरुद्ध गु र नं ४१/२०२४ भा दं वि ३९४ आणि ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचा तपास युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस ।निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे करीत आहेत. दरम्यान या प्रकरणी गुन्हा दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक साबळे, पोलीस उपनिरीक्षक राडकर आणि त्यांच्या पथकाने गुप्त माहिती काढली. या पथकाला एका गुप्त महितीगाराने दिलेल्या माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक साबळे, पोलीस उपनिरीक्षक राडकर, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस जमादार राजू पठाण, तुळशीराम जगताप, बाळकृष्ण जायभाये, अर्जुन यादव, मारुती कांबळे, रामदास तांदळे अतुल हराळे, राहुल शिंदे, पी टी चव्हाण आणि जायभाये यांच्या पथकाने पेट्रोल पंपाच्या दरोड्यातील आरोपीची गुप्त पद्धतीने माहिती काढून विकास सुभाष सावंत (रा. सावंतवाडी, उमरी फाटा ता. केज), अजय उर्फ अज्जू अशोक तांदळे (रा. कोरेगाव ता केज), सोमनाथ राजाभाऊ चाळक (रा. लव्हूरी ता. केज), बालाजी राम लांब (रा कोरेगाव ता. केज), रवी उर्फ आण्णा दत्तात्रय सुर्यवंशी (रा. पिसेगाव ता. केज) यांना ताब्यात घेतले आहे त्यांच्याकडून पेट्रोल पंपाच्या दरोड्यातील २ लाख रु. आणि गुन्ह्यात वापरलेले५ कोयते, २ मोटार सायकली व इतर साहित्य ताब्यात घेतले आहे. एक आठवड्याच्या आत तपास करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी ताब्यात घेतल्या बद्दल स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




दरोडेखोर ताब्यात घेतल्याने अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता :- या कोयता गँगने कळंब आणि वडवणी येथील पेट्रोल पंपावर दरोडा टाकल्याची शक्यता असून दि. २४ जानेवारी रोजी केज तालुक्यातील केज-मांजरसुंबा रोडवर शिंदी फाट्यावर समाधान यादव या पिग्मी एजंटांची मोटार सायकल अडवून त्याच्यावर कोयत्याने हल्ला करून खिशातील मोबाईल व ५७ हजार रु. काढून घेतले असल्याची शक्यता आहे. पोलीस त्याची कसून चौकशी करीत आहेत.

# संपादकीय

## फॅसिझमचे पुरस्कर्ते व्लादमिर पुतीन

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादमिर पुतीन हे जगात आक्रमक राष्ट्राध्यक्ष म्हणून ओळखले जातात. रशियावर त्यांची एक हाती हुकूमत आहे. एक प्रकारे ते रशियाचे हुकूमशहाच आहे. रशियात त्यांच्याविरुद्ध कोणी ब्र शब्दही काढत नाही. सत्तेवर येताच त्यांनी घटना दुरुस्ती करून स्वतः कडे अमर्याद अधिकार घेतले इतकेच नाही तर त्यांनी निवडणुका न घेताच पुढील काही वर्षासाठी स्वतः ला रशियाचा अनाभिषिक्त सम्राट म्हणून घोषित केले. लोकशाहीचा आणि त्यांचा दुरान्वये संबंध नाही.



फॅसिझमचे कट्टर पुरस्कर्ते असलेले पुतीन यांना कोणी विरोध केलेला चालत नाही. त्यांच्या देशात त्यांना विरोध करणे म्हणजे साक्षात मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे त्यामुळे तसे धाडस कोणी करत नाही मात्र काही लोक असतात जे मृत्यूलाही न घाबरता जनतेसमोर सत्य मांडण्याचा प्रयत्न करतात. असेच धाडस त्यांचे राजकीय विरोधक अलेक्सा नवालनी यांनी केले. नवालनी यांनी पुतीन यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले पुतीन यांनी त्यांच्या काळात मोठा भ्रष्टाचार केला असून या भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांनी मोठे जनआंदोलन उभारले होते. जनतेचाही या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत होता. या दरम्यान त्यांच्यावर एकदा विष प्रयोग ही करण्यात आला होता. ते जर्मनीत असताना त्यांच्यावर विष प्रयोग करण्यात आला. पुतीन यांनीच त्यांच्यावर विष प्रयोग करून त्यांना जिवेमारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तेंव्हा करण्यात आला होता. विष प्रयोग होऊनही नवालनी त्यातून बचावले होते. जर्मनीतून ते पुन्हा मॉस्कोत आले आणि त्यांनी पुतीन यांच्या विरोधातील आंदोलन पुन्हा सुरू केले. नवालनी यांना जनतेचा पाठिंबा मिळत आहे असे दिसताच पुतीन यांनी त्यांना पॅरोलचे उल्लंघन, फसवणूक आणि न्यायालयाचा अपमान या गुन्ह्याखाली अटक केली त्यांना तब्बल नऊ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली. पुतीन यांच्या या निर्णयाविरोधात रशियात मोठा जनक्षोभ होता मात्र उघडपणे तसे कोणीही बोलत नसे. दोन महिन्यांपूर्वी नवालनी यांना अचानक रशियाच्या तुरुंगातून अर्टिक सर्कलवर असलेल्या विशेष तुरुंगात हलवण्यात आले. नवालनी यांना ज्यावेळेस अर्टिक सर्कलच्या विशेष तुरुंगात हलवण्यात आले तेंव्हाच काही तरी विपरीत घडणार अशी शंका व्यक्त करण्यात आली आणि ती शंका मागील आठवड्यात अखेर खरी ठरली. मागील आठवड्यात नवालनी यांचा तुरुंगात मृत्यू झाल्याची बातमी आली. नवालनी यांचा आजापणामुळे मृत्यू झाल्याचे पुतीन सरकारकडून जाहीर करण्यात आले असले तरी अनेकांनी नवालनी यांचा मृत्यू आजारपणामुळे झाला नसून त्यांची हत्याच झाल्याचा आरोप केला आहे. खुद्द नवालनी यांच्या कुटुंबीयांनी देखील तसाच आरोप केला आहे. अर्थात नवालनी यांची हत्या झाली की त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाला हे कायम गुलदस्त्यात राहणार आहे कारण हुकूमशहांच्या देशातील कोणतीही खरी गोष्ट जगासमोर येत नाही मग तो देश चीन असो उत्तर कोरिया असो की रशिया. अर्थात या तिन्ही देशांचे प्रमुख फॅसिझमचे प्रतिनिधित्व करतात म्हणूनच या देशात लोकशाही नसून हुकूमशाही आहे. चीन आणि उत्तर कोरिया या देशांतील प्रमुखां प्रमाणे पुतीन यांनीही रशियावर आपली एक हाती हुकूमत राखली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले पुतीन हे के जी बी या रशियाच्या गुप्तहेर संस्थेत काम करीत होते. तेथील त्यांच्या कामावर रशियाचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बोरिस येल्तसिन इतके खुश झाले की त्यांनी पुतीन यांना आपला राजकीय वारस बनवले. रशियात पुतीन यांच्याबाबतीत अनेक भाकडकथा प्रसिद्ध आहेत . के जी बी मध्ये असताना त्यांनी केलेले काम पाहून लोकांनी त्यांना हिरोची उपमा दिली होती मात्र आता ते ज्या पद्धतीने सरकार चालवत आहे त्याविषयी लोकांमध्ये त्यांच्याविरुद्ध प्रचंड नाराजी आहे. त्यांनी युक्रेनवर केलेला हल्ला अनेक रशियन नागरिकांना आवडला नाही. त्यातच नवालनी यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याने ही नाराजी आणखी वाढली आहे मात्र पुतीन यांना त्याचा काही फरक पडणार नाही कारण ते कधीच लोकशाही मानत नाही. मात्र आज नाही तर भविष्यात जनता रस्त्यांवर नक्की उतरेल आणि जनताच पुतीनशाहीचा अंत करेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# शिवरायांचे महिला विषयक धोरण आणि आजची स्थिती

रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला.आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे.

चार वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना आजही सर्वांच्या स्मरणात आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता.चार वर्ष उलटूनही हिंगणघाटच्या या निर्भयाला न्याय मिळालेला नाही. या नराधमाला फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हिंगणघाटचा हा नराधम आजही न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडतोय. या शिक्षेविरुद्ध त्याने आता वरच्या न्यायालयात अपील केली आहे. हिंगणघाटची घटना स्त्री अत्याचाराची ही महाराष्ट्रातील पहिली घटना नव्हती. या आधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. कोपर्डीची घटना तर ताजीच आहे. कोपर्डीच्या घटनेने संपूर्ण समाजमन ढवळून निघाले होते. हिंगणघाट, कोपर्डी हे फक्त उदाहरणे आहेत. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच.अगदी सहा वर्षाच्या चिमुरडी पासून साठ वर्षाच्या वृद्धे सोबतही अत्याचार होतो. घर, शाळा, कामाचे किंवा सार्वजनिक ठिकाण इतकेच काय तर पोलीस स्टेशन मध्ये देखील महिलांवर अत्याचार झाल्याच्या घटना आपण वाचल्या आहेत. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी - विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते.



जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात.

रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५-**

# शिवप्रतापाविण महाराष्ट्र इतिहास अपूर्ण!

महाराष्ट्रच नव्हे तर अख्ख्या भारताचे लाडके छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवरायांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. शिवाजीरिजे आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजीराजे यांचा संयुक्त नामोल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार शिवाजी महाराजांचा जन्म- १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू- १७०७ या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात.

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो. अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. सन २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स.१६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३० रोजी छ.शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि.१९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुन:स्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे



शिक्षण, परकीय सत्तेविरुद्ध लढा देण्याचे आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

शिवरायांची राजमुद्रा: छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी- "प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते!" त्याचा मराठी अर्थ- "ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!"

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल. बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील. महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते. शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स.१६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले.

शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू दि.३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला, असे सांगितले जाते. !! शिवजयंती निमित्ताने शिव छत्रपतींना मानाचा मुजरा व सर्वांना प्रेरणादायी शिवमय हार्दिक शुभेच्छा!!

**लेखन -**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली ९४२३७१४८८३.**

# पाटोदा तालुक्यातील शेतकरी आजही खरीप २०२३ च्या विम्या पासून वंचित

## तारखेवर तारीख दिली जातेय पालकमंत्री तथा कृषी मंत्री लक्ष द्या

**वादळवार्ता/पाटोदा**

पाटोदा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना अद्यापही खरीप २०२३ चा पिक विमा मिळालेला नाही आज मिळेल उद्या मिळेल अश्या पोकळ घोषणा व तारखेवर तारीख विमा कंपनीकडून सोबतच प्रशासनाकडून दिले जात आहे खरीप विमा मिळण्याची मुदत संपली तरीही अद्याप शेतकऱ्यांना विमा मिळाला नाही पालकमंत्री तथा कृषी मंत्री यांनी शेतकऱ्यांना आता विमा नेमका कधी मिळणार सांगावे सोबतच विमा कंपनीकडून पिक विमा उशिराने देण्यात येत असल्याबद्दल शेतकऱ्यांना व्याजासकट पिक विमा देण्याचे कंपनीला आदेशीत करावे अन्यथा अनेक शेतकरी विमा कंपनी सोबतच प्रशासनाच्या विरोधात न्यायालयाचे दार ठोठावणार असल्याचे शेतकरी बोलत आहे पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांची २०२३ चे खरीप पिक हे पावसाच्या खंडाने पूर्णपणे गेले होते याची जाण ठेवत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांना 25% अग्रमी पिक विमा देण्याची विमा कंपनीस आदेशित केले होते या संदर्भात विमा कंपनीने जिल्हाधिकारी च्या आदेशाला आव्हान देत अनेक ठिकाणी अपील केले मात्र विमा कंपनीने केलेले अपील फेटाळण्यात आल्यानंतर विमा कंपनीस विमा देणे भाग पडले विमा कंपनीने तालुक्यातील अत्यल्प व तसेच अल्प भूधारक काही शेतकऱ्यांना सोयाबीनचा २५% अग्रणी पीक विम्याची रक्कम दिली मात्र दोन हेक्टर च्या पुढील शेतकऱ्यांना चौकशी होत आहे च्या नावाखाली अद्यापही पीक विमा मिळालेला नाही.

शेतकऱ्यांना पिक विमा मेळावा यासंदर्भात तालुक्यात कमीत कमी दहा ते पंधरा वेळा शेतकऱ्यांनी तसेच विविध संघटना व पक्षांनी विविध प्रकारचे आंदोलने केली यामध्ये रास्ता रोको ठिय्या धरणे आंदोलने बेमुदत धरणे आंदोलने उपोषणे केली मात्र अद्याप पावेतो विमा कंपनीने शेतकऱ्याला विमा दिला नाही फक्त फसवणूक करीत आलेली आहेत . आंदोलन गुंडाळून घेण्याकरिता आंदोलन करत्या शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून व तसेच प्रशासनाकडून येत्या आठ दिवसात पंधरा दिवसात विमा देण्यात येईल अशा तारखेवर तारखा दिल्या गेलेल्या आहेत आज शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला असताना सुद्धा प्रशासनास व विमा कंपनीस कसल्याही प्रकारचे देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे विमा मिळण्यास उशीर होण्याचे नेमकं कारण काय ,? हे पण गुलदस्त्यात आहे. कंपनीकडून विमा देण्यासंदर्भाची मुदत निघून गेली आहे या बाबतीत विमा कंपनीवर प्रशासनाने गंभीर कारवाई करण्यात यावी विमा कंपनीला टाळेवर आणण्यासाठी शेतकऱ्यांना पिक विमा देण्यास उशीर केल्याबद्दल विमा कंपनीस व्याजासह शेतकऱ्यांना पिक विमा देण्याचे आदेशित करावे अशी मागणी आता शेतकरी वर्गाकडून होत आहे. येत्या आठ दिवसात जर शेतकऱ्यांना खरीप २०२३ चा पिक विमा मिळाला नाही तर अनेक शेतकरी हे विमा कंपनीच्या तसेच प्रशासनाच्या विरोधात न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत

# महारक्तदान शिबिरास जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांची उपस्थिती



दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चिटणीस तथा रायगड जिल्हा काँग्रेस सहप्रभारी श्रीरंग बरगे यांच्या वाढदिवसा निमित्ताने महाराष्ट्र एस.टी.कर्मचारी काँग्रेस तर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत उपस्थित राहून श्रीरंग बरगे यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी त्यांच्या समवेत फिशरमन काँग्रेस प्रदेश अध्यक्ष मार्तंड नाखवा,रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष अखलाक शिलोत्री आदी उपस्थित होते.

# वरपगाव येथे वैं. रामकृष्ण महाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अंखंड हरिनाम सप्ताह आजपासून सुरु.

## हरिनाम सप्ताह, भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

वादळवार्ता/केज

केज तालुक्यातील वरपगाव येथील श्रीक्षेत्र शिवरामपुरी मठ संस्थान येथे वै. महंत रामकृष्ण महाराज यांच्या १८ व्या पुण्यस्मरणानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे २३ फेब्रुवारीपासून आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात नामवंत किर्तनकारांची कीर्तनसेवा होणार असून या कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. असे आवाहन मठाधिपती भगवान महाराज शास्त्री यांनी केले आहे.

सोहळ्यात भागवत कथेचे रामकृष्ण महाराज शास्त्री हे तर ज्ञानेश्वरीचे महेश महाराज टेकाळे व गणेशानंद महाराज जोगदंड हे पारायण करणार आहेत. तर





२३ फेब्रुवारी रोजी पांडुरंग महाराज क्षीरसागर यांचे, २४ फेब्रुवारी रोजी जगन्नाथ महाराज देशमुख यांचे, २५ फेब्रुवारी रोजी अमृताश्रम स्वामी महाराज यांचे, २६ फेब्रुवारी रोजी संदीपान महाराज हसेगावकर यांचे, २७ फेब्रुवारी रोजी चांगदेव महाराज कंडारीकर यांचे, २८ फेब्रुवारी रोजी महंत श्रीराम महाराज विडेकर यांचे, २९ फेब्रुवारी रोजी रामयनाचार्य नामदेव महाराज लबडे यांचे कीर्तन होणार आहे. सोहळ्याची सांगता १ मार्च रोजी सकाळी महंत भगवान महाराज शास्त्री यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने होणार आहे व त्यानंतर महाप्रसाद वाटप होणार आहे.

या कार्यक्रमास पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाधिपती महंत भगवान महाराज शास्त्री, साधु शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव ता. केज जि. बीड व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बलभीम महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाची गणराज पाईप्स या इंडस्ट्री येथे शैक्षणिक सहल संपन्न



दैनिक वादळ वार्ता

बीड- प्रतिनिधी: म.शि.प्र. मंडळ संचलित बलभीम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बीड, रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी आज गणराज पाईप्स् कंपनीला भेट दिली. या कंपनीचे संचालक ईजि. मा. संतोष उपरे साहेबांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच कंपनीमधे तयारी होणारे पाईप्स व त्यासाठी लागणारा कच्च्या माल याबद्दल माहिती देऊन तरुणांनी उद्याजक व्हावे त्यासाठी भांडवल कसे उभारावे, बँकेमधून लोन, व्यवसायासाठी शासकीय योजनेतून अनुदान कसे मिळवावे याबद्दल सविस्तर माहिती दिली. जर विद्यार्थ्यांना भविष्यात उद्योजक व्हावयाचे असेल तर गणराज पाईप्स कंपनीकडून सर्व सहकार्य करण्यात येईल असा विश्वास दिला. या इंडस्ट्रील व्हिजीटचे आयोजन प्राचार्य व रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रो.डॉ. संतोष उंदरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सहल समन्वयक डॉ. एस.बी. खामकर मॅडम यांनी केले, त्यांना रसायनशास्त्र विभागातील डॉ.एम. ए. साखरे, डॉ. ए.के. आघाव, प्रा. एस.ए. सुरवसे, डॉ. पी.डी. जावळेपाटिल, डॉ. ए. बी. दन्ने, डॉ. एस.बी. चौधरी, डॉ. अनिल शेंडगे, प्रा. लोकरे मॅडम इ. प्राध्यापकांनी सहकार्य केले. या शैक्षणिक सहलसाठी रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यी व विद्यार्थ्यीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पैठण येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाआरोग्य शिबिर संपन्न



**वादळवार्ता/केज**

पैठणचे भूमिपुत्र डॉक्टर कैलास पैठणकर बीड यांच्या उपस्थितीमध्ये आयोजित केले होते.पैठण येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाआरोग्य शिबिर संपन्न

पैठणचे भूमिपुत्र डॉक्टर कैलास पैठणकर बीड यांच्या उपस्थितीमध्ये आयोजित केले होते . केज तालुक्यातील पैठण येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि २२रोजी सकाळी अकरा वाजता महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात जवळपास ५०० च्यावर रूग्णांनी लाभ घेतला.प्रती वर्षा प्रमाणे या हि वर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज जयंती समिती कडुन आयोजित करण्यात आले होते केले याहि वर्षी रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबिर, गुणवंतांचा गुण गौरव सोहळा, वक्तृत्व स्पर्धा,अशा विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले आहे,या पैकी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले यात ५०० च्या वर रूग्णांनी याचा लाभ घेतला तर यात दोन लाख रु किंमतीची औषधे रुग्णांना मोफत वाटण्यात आली,या शिबिरात डोळे तपासणी,पोटाचे आजार तपासणी,स्त्रीयांचे आजार तपासणी, तसेच मानसोपचार तज्ज्ञ यांनी देखील झोप न येणे स्वप्नं पडने आदी रुग्णांना मोफत तपासले,व यातील सहभागी रुग्णांना उपलब्ध दोन लाख रुपये किंमतीची औषधे मोफत वाटण्यात आली, या शिबिराचा लाभ गावातील महिलांना , जेष्ठ नागरिक,अबाल वृद्ध यांनी मोठ्या प्रमाणात घेतला ,या वेळी डॉ.चंद्रकांत गायकवाड पोट विकार तज्ञ,डॉ. खिराजी पाखरे नेत्रतज्ज्ञ ,डॉ.सुदाम मोगले मानसोपचार तज्ञ,डॉ. कैलास पैठणकर पोट विकार तज्ञ ,डॉ.अनिमेश पैठणकर,एम.बी.बी. एस.सुरज जाधव औषधनिर्माता, अतुल दाभाडे ब्रदर ,डॉ शिवाजी मस्के ,डॉ उपेंद्र कुलकर्णी स्त्रीरोग तज्ज्ञ यांनी रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार केले .

माझ्या जन्म भुमीतील, गावातील गोरगरीब रुग्णांना पोटाचे विकार असतील अशा सर्व रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातील,अशा रुग्णांनी संपर्क साधावा....... डॉ कैलास पैठणकर पोटविकार तज्ञ. असे अहवान करण्यात आले

माझ्या जन्म भुमीतील, गावातील गोरगरीब रुग्णांना पोटाचे विकार असतील अशा सर्व रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातील,अशा रुग्णांनी संपर्क साधावा....... डॉ कैलास पैठणकर पोटविकार तज्ञ. असे अहवान करण्यात आले केज तालुक्यातील पैठण येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि २२रोजी सकाळी अकरा वाजता महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरात जवळपास ५०० च्यावर रूग्णांनी लाभ घेतला प्रती वर्षा प्रमाणे या हि वर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज जयंती समिती कडुन आयोजित करण्यात आले होते केले याहि वर्षी रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबिर, गुणवंतांचा गुण गौरव सोहळा, वक्तृत्व स्पर्धा,अशा विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले आहे,या पैकी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले यात ५०० च्या वर रूग्णांनी याचा लाभ घेतला तर यात दोन लाख रु किंमतीची औषधे रुग्णांना मोफत वाटण्यात आली,या शिबिरात डोळे तपासणी,पोटाचे आजार तपासणी,स्त्रीयांचे आजार तपासणी, तसेच मानसोपचार तज्ज्ञ यांनी देखील झोप न येणे स्वप्नं पडने आदी रुग्णांना मोफत तपासले,व यातील सहभागी रुग्णांना उपलब्ध दोन लाख रुपये किंमतीची औषधे मोफत वाटण्यात आली, या शिबिराचा लाभ गावातील महिलांना , जेष्ठ नागरिक,अबाल वृद्ध यांनी मोठ्या प्रमाणात घेतला ,या वेळी डॉ.चंद्रकांत गायकवाड पोट विकार तज्ञ,डॉ. खिराजी पाखरे नेत्रतज्ज्ञ ,डॉ.सुदाम मोगले मानसोपचार तज्ञ,डॉ.कैलास पैठणकर पोट विकार तज्ञ ,डॉ.अनिमेश पैठणकर,एम. बी.बी.एस.सुरज जाधव औषधनिर्माता, अतुल दाभाडे ब्रदर ,डॉ शिवाजी मस्के ,डॉ उपेंद्र कुलकर्णी स्त्रीरोग तज्ज्ञ यांनी रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार केले .

# ज्ञानदीप विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी.



**वादळवार्ता/किल्लेधारूर**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक,अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, लोककल्याणकारी,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती धारूर येथील ज्ञानदीप विद्यालय व बालसंस्कार केंद्रात विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

धारूर येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाव बाल संस्कार केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली,विद्यालयातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी पोवाडे व गीतांचे सादरीकरण केले, ढोल ताशांच्या गजरात महाराजांना त्रिवार मानाचा मुजरा करत शिवरायांचे जयघोषाणे शाळेचा परीसर दणाणूण गेला होता. यावेळी विद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३३ वर्षांनी पडल्या मित्र मैत्रिणींच्या गाठी भेटी स्नेहसंमेलन चा कार्यक्रम

**वादळवार्ता/शिरुर कासार**

भालगाव तालुका पाथर्डी येथील भालकेश्वर हायस्कूल भालगाव मध्ये सन १९९० च्या बॅचमधील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी गुरुजन वर्ग आदींचा स्नेह संमेलनाचा कार्यक्रम तब्बल ३३ वर्षांनी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडला या उपक्रमात सर्वांनी भरभरून प्रतिसाद देऊन जुन्या आठवणींना उजाळा देत सर्व सहकारी बालपणात रमले होते

१९९० च्या दहावीनंतर सर्व सहकाऱ्यांनी मी असा घडलो मी अशी घडले या विषयावर मंथन केले १९९० सालच्या वेळी आमची ७० विद्यार्थ्यांची बॅच होती आजच्या कार्यक्रमाला जवळपास ५० ते ६० सहकारी उपस्थित राहून हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाच्या वातावरणामध्ये संपन्न झाला याप्रसंगी सकाळी 11 वाजता शाळेची घंटा वाजवून श्रीमान काटे सरांनी सर्वांना रांगेत उभे करून सावधान विश्राम आदेश देऊन प्रार्थना घेऊन वर्गात जाण्याचा आदेश दिला भालगाव येथील प्रशालेचा लोक असलेल्या टोप्या परिधान केल्या होत्या यामध्ये काही आमची स्नेही काळाच्या ओघात विलीन झाल्याने प्रथमतः या सर्वांना व काही गुरुजन हे देखील दिगंवत झाल्याने या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर जमलेल्या व आवर्जून या उपक्रमात उपस्थित राहिलेल्या गुरुजनांना स्नेह भेट देऊन त्यांचे आदरतिथा केले व त्यांचे विचार पुन्हा आम्हास



उर्वरित आयुष्यासाठी प्रेरणादायी ठरले आमच्या सर्व मित्र मैत्रिणींनी आम्हाला आपापल्या आयुष्यातील चढ-उतार गमती जमती याचे सर्वांनी कथन केले आपापल्या सर्वांची यश व आनंद पाहून समाधान झाले असल्याची भावना सर्वांनी विशद केली चांगले शिक्षण मिळावे व ते देण्याचा आमचा संकल्प होता यावरच आपल्या सर्वांचे दैव असते आपापल्या कार्यावर अवलंबून असते अशा भावना व्यक्त केल्या उपस्थित सर्व मित्र मैत्रिणींनी १९९० च्या सर्वांनी आपापल्या वाट्याला आलेले आयुष्यभर आपापला सर्व गोष्टी एकमेकांना सांगून प्रेरणादायी असे सर्वांनी विचार मंथन केले आलेल्या सर्व मित्र मैत्रिणींनी बऱ्याच वर्षानंतर भेटल्याने हा उपक्रम घेणारे यांना सर्वांनी शुभेच्छा दिल्या व आभारही मानले याप्रसंगी सर्वांनी अल्पोहार व स्नेहभोजनाने व आपापल्या आठवणीने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन ज्ञानदेव व गंगाधर सुपेकर यांनी करून श्रीमती संगीता डमाळे व श्रीमती सरिता लुनावत यांनी आलेल्या सर्वांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता केली. याप्रसंगी डॉक्टर सुधाकर खेडकर किशोर सुपेकर भागवत खेडकर अडवोकेट कैलास खेडकर सतीश हंगे महादेव खेडकर महावीर छाजेड अशोक हिंगे अनारकली गुळवे सुनीता मोरे विजयमाला सुपेकर कलावती लाटे बेबी खेडकर बंडू खेडकर संजय खेडकर महेश डमाळे शांता सुपेकर सविता खेडकर गुंफा कासुळे गोदावरी गायके विमल घुले आदी १९९० च्या सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवली अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये हा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला

दैंनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता
संपादक ; अजय भांगे मो . ९४२२६६००७७

## बोरीसावरगाव येथील श्री गजानन गुरूकुल येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### कलाविष्कारातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो--डॉ हनुमंत सौदागर







वादळवार्ता/केज
केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथे श्री गजानन गुरुकुल बोरीसावरगाव येथे बुधवार रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकर (बापू) महाजन,सौ छायाताई महाजन, प्रमुख पाहुणे तथा उडघाटक डॉ हनुमंत सौदागर,प्रा संजय देशमुख ,ॲड गणेश महाजन,प्राचार्य रविंद्र अंबाड, यांची होती. सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मराठी ,हिंदी, इंग्रजी ,लोकगीते ,भावगीतेदेशभक्तीपर , भक्तीगीत पथनाट्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी उद्घाटन कार्यक्रमात बोलताना पाल्यांच्या शिक्षणावर पालकांनीही लक्ष केंद्रित करावे. असे मत प्रा संजय देशमुख यांनी व्यक्त केले. डॉ हनुमंत सौदागर यांनी कलाविष्कारातून विद्यार्थी घडतो. यामधूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहशिक्षक गणेश गुळवे , मेघराज कदम ,बनेश्वर गोरे , दिग्विजय राउत,सौ भाग्यश्री नवघन,सौ लक्ष्मी कांबळे,सौ सीमा साकळे,सौ दिपाली बीडवे,सौ सोनाली थोरवे,सौ सारीका भीसे ,सौ,श्रुती गुळवे,सौ अणुजा कावळे,सौ दिपाली अंबाड ,सौ स्वप्नाली गोरे ,सौ उज्वला थळकरी,सौ विश्रांती जाधव आदींनी परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन लक्ष्मी कांबळे सारिका भिसे यांनी केले. स्नेहसंमेलन कार्यक्रमास परिसरातील विविध गावातून पालक, विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न...

### महापुरुषांचे चरित्र वाचने गरजेचे- पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील





वादळवार्ता/ केज
केज शहरातील शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित शाळा पवनराजे इंग्लिश स्कूल व कै.राम चौरे मा.उच्च माध्यमिक विद्यालय केज येथील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांना आनंदाच्या वातावरणात निरोप दिला."निरोप घेता तुमचा, हृदय हे दाटले;स्नेह आपुलकीचे बंध मनात साठले." या घोषवाक्याने निरोप घेणाऱ्या इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांच्या डोळयात अश्रू दाटले.
या बाबत वृत्त असे कि केज शहरातील नामांकित इंग्लिश माध्यमाची शाळ पवनराजे इंग्लिश स्कुल येथे इयत्ता १० वीच्या विद्यार्थांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणुन श्री.खंडेरावजी चौरे सर, प्रमुख मार्गदर्शक श्री.राजेश पाटील (पोलीस उपनिरीक्षक केज),तसेच श्री.मस्के सर(प्राचार्य पवनराजे इंग्लिश स्कूल) हे होते मान्यवरांच्या हस्ते शारदा मातेचे पुजन व दिपक प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.कार्यक्रमास मार्गदर्शक श्री. राजेश पाटील यांनी आपल्या मनोगतात १० वी नंतर च्या देशांचा अत्ताच वेध घ्यायला हवा हा मोलाचा संदेश दिला.क्षेत्र कोणतेही असो मग ते डॉक्टर किंवा राज्यसेवा असो त्यासाठी जिद्द, चिकाटी, मेहनत तसेच थोरांचे चरित्र वाचन,चिंतन व स्मरण हे गुण विद्यार्थ्यांमध्ये असायला हवे हे विद्यार्थ्यांना सांगितले. आईवडील यांनी शाळा दाखवून दिली मात्र गुरूनी जग दाखवले.सुंदर जिवन जगण्याचे धडे शिकवले अशा शब्दांत दहावीच्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. निरोप समारंभ कार्यक्रम इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी आयोजित करून दहावीच्या विद्यार्थ्यांना हसत-रडत निरोप देत भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजय भांगे सर यांनी केले तर आभार श्री.घुले सर यांनी मानले.कार्यक्रमास उपस्थित सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर वृंद उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयतील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

### ध्येय निश्चित ठेवल्यास यश नक्कीच मिळेल -डॉ. हनुमंत सौदागर

**वादळवार्ता/केज**
केज तालुक्यातील काळेगाव( घाट) येथील काळेगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये नुकताच इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला या निरोप समारंभ साठी प्रमुख पाहुणे म्हणून भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयाचे डॉ.हनुमंत सौदागर उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून काळेगाव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राहुल गदळे होते. सर्वप्रथम सरस्वती देवीच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. व त्यानंतर आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये इयत्ता दहावीतील विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना या शाळेमधील शिक्षकांनी आम्हाला इयत्ता पाचवीपासून आमच्या आई-वडिलांसारखे सांभाळून आम्हाला योग्य ते वेळोवेळी मार्गदर्शन केले प्रत्येक शिक्षकांनी आपापल्या विषयात चांगले शिक्षण दिले त्याबद्दल आम्ही सर्व सरांचे अत्यंत ऋणी आहोत . अशा प्रकारचे मनोगत व्यक्त केले त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. हनुमंत सौदागर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा अभ्यास व त्यांनी केलेल्या अभ्यासाविषयी विचारून पुढील मार्गदर्शन केले. डॉ हनुमंत सौदागर यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित केल्याशिवाय यश संपादन करता येत नाही याचे अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याबरोबर या शिक्षणाचा फायदा आपल्या व्यवहारीक जीवनामध्ये केला पाहिजे कारण आपण समाजामध्ये राहत असताना समाजातील प्रत्येक घटकाशी आपला संबंध जोडलेला असतो. शिक्षण घेत असताना आपण सर्वप्रथम आपला मार्ग शोधला पाहिजे तरच आपण त्या मार्गावर चाललो तर आपल्याला ते ध्येय साकार करता येईल. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांशी प्रमाणिक राहून अभ्यास करावा जेणेकरून आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करता येईल. अशा प्रकारचे अनमोल मार्गदर्शन डॉ हनुमंत सौदागर यांनी विद्यार्थ्यांना केले. व आई विषयी कवितेतून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री राहुल गदळे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले तर परीक्षेत कोणत्याही प्रकारचा प्रश्न जरी आला तरी त्या प्रश्नाचे उत्तर लिहिण्यास अधिक विचार करण्याची गरज लागत नाही तसेच आपण या शाळेचे विद्यार्थी आहात आणि पुढेही राहतील व तुमच्यासाठी कोणत्याही अडचन आली तरी आपणास आश्वासन देतो की, आपल्यासाठी तूमची शाळेतील अडचन सोडविण्यासाठी सदैव तयार आहे. येणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी आपणास खूप खूप शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन . मोरे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. जावेद शेख यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## परळीत २५ फेब्रुवारीला होणाऱ्या राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषदेला येणाऱ्या वाहनांना रस्ता रोकोचा अडथळा होणार नाही !

### न्याय हक्कांसाठी लढणाऱ्यांना आमचा पाठिंबा: मनोज जरांगे-पाटील यांनी दिले आश्वासन

वादळवार्ता/परळी
येत्या २५ फेब्रुवारी रोजी परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषद होत आहे. या परिषदेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून समाज बांधव परळी मध्ये दाखल होणार आहेत. मात्र मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी दि. 24 फेब्रुवारीपासून गावागावात रस्ता रोको आंदोलनाची हाक दिलेली आहे. या अनुषंगाने ब्राह्मण ऐक्य परिषदेचे स्वागताध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी शिष्टमंडळासह आज मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेतली. यावेळी तुमचा लढा न्याय हक्कासाठी आहे त्याला आमचा पाठिंबा असल्याचे सांगून महाराष्ट्रातून ब्राह्मण ऐक्य परिषदेसाठी परळीत येणाऱ्या वाहनांना रस्ता रोको आंदोलनाचा अडथळा ठरणार नाही असे ठोस आश्वासन मनोज जरांगे-पाटील पाटील यांनी दिले आहे.
मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून सगेसोयऱ्यांचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. जरांगे-पाटील यांनी राज्य सरकारला मागण्या मान्य करण्यासाठी दोन दिवसांचा अवधी दिला आहे. अन्यथा २४ फेब्रुवारीपासून राज्यभरातील सगळ्या गावांमध्ये एकाचवेळी रास्ता रोको आंदोलनाला सुरुवात होईल असा इशारा दिलेला आहे. या अनुषंगाने राज्यस्तरीय ब्राह्मण परिषदेचे स्वागताध्यक्ष परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी शिष्टमंडळासह मनोज जरांगे पाटील यांची आंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतली व त्यांना या ऐक्य परिषदेबाबत सविस्तर माहिती देऊन चर्चा केली.दि. २५ फेब्रुवारी रोजी परळी वैजनाथ येथे होणाऱ्या ब्राह्मण ऐक्य परिषदेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने ब्राह्मण समाज बांधव येणार आहेत.यासंदर्भात बोलतांना मनोज जरांगे-पाटील यांनी ब्राह्मण समाज बांधव हे न्याय हक्कांसाठी लढत आहे. त्यामुळे ऐक्य परिषदेला येणारांना आमच्या आंदोलनाचा अडथळा ठरणार नाही असे ठोस आश्वासन मनोज जरांगे-पाटील पाटील यांनी दिले आहे.यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्यासह दिलीप जोशी,शैलेश कुलकर्णी, जितेंद्र नव्हाडे आदी उपस्थित होते.



## केज येथे आचार्य विद्यासागर जी महाराज यांना विनयांजली अर्पण



**वादळवार्ता/केज**
केज येथील भगवान महावीर दिगम्बर जैन मंदिर येथे आचार्य श्री १०८ विद्यासागर जी महाराज यांच्या भव्यात्म्याला विनयांजली अर्पण करण्यात आली. यावेळी समाजातील भगिनी , बालवर्ग, धर्म प्रेमी बंधु मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथम गुरुवरांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून त्यांच्या गुणानुवादांचे उद्बोधन केले. विनयांजली सभा कार्यक्रम अध्यक्ष अमोल बाबुराव देवधारे , सौ अक्षता जीतेंद्र देवधारे यांनी आचार्य श्रीं च्या गुणानुवादांचे उद्बोधन केले. विनयांजली सभा कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदिर संस्थान चे उपाध्यक्ष जीतेंद्र शांतिनाथजी देवधारे यांनी केले. यावेळी जितेंद्र प्रेमचंद देवधारे, अनमोल देवधारे, अजिंक्य देवधारे, शेखर देवधारे, मनोज चौभारकर, अमित काळेगोरे, पंकज अन्नदाते, धीरज काळेगोरे, संजय देशमाने, राजकुमार देशमाने, मनोज काळेगोरे, कल्याण अन्नदाते, श्रेयस घेवारे आदींची उपस्थिती होती. सर्वांनी सामुहिक भक्तामर स्त्रोत्र पठन केले व भगवंताची आरती करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार जितेंद्र देवधारे यांनी केले.

## मानसिक त्रासामुळे अपमानजनक वागणुके मुळे (१९ वर्षीय) तरुणीने संपवले जीवन

### गरुडझेप अकॅडमीच्या संचालकासह पाच जणांविरुद्ध गुन्हा,संचालक फरार

**असह्य म्हणून टोकाचे पाऊल**
**○ असहाय छळामुळे टोकाचे पाऊल उचलले पालकांनी समजून काढल्यानंतर पुन्हा बजाज नगरात आलेल्या लीना ला पुन्हा वारंवार छळले जात होते**

**यामुळे होणारा त्रास असह्य झाल्याने लेनाने टोकाचे पाऊल उचलत मंगळवारी दिनांक 20 रोजी अकॅडमीच्या बाथरूम मध्ये**

**यापूर्वी आतेबहिणीनेही अकॅडमी सोडलेली**
**आत्महत्येची माहिती मिळताच तिच्या पालकांना मानसिक धक्का बसला विशेष म्हणजे या अकॅडमीत प्रशिक्षण घेणाऱ्या तिच्याच आते बहिणीने मानसी पाटील याच कारणामुळे दोन महिन्यापूर्वी प्रशिक्षण सोडले होते लीनाच्या वडिलांनी श्रीराम पाटील अकॅडमीच्या संचालक व कर्मचाऱ्यांनी विरुद्ध तक्रार दिली**


**तक्रारीवरून संचालक प्राध्यापक निलेश सोनवणे सुरेश सोनवणे व्यवस्थापक राठोड शुभम भोंगे वार्डन मीरा या पाच जनाविरुद्ध तिला आत्महत्येस प्रवत केल्याप्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे**

**याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सचिन पागोटे हे करीत आहे गुन्हा दाखल झाल्याची कोण कोण लागतात अकॅडमीचे संचालक व कर्मचारी फरार झाले असून त्यांचा शोध पोलीस घेत आहेत**

**सातत्याने होणाऱ्या आत्महत्या सत्राचे सबंध वाळूज परिसर हादरला असून विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे**

दैनिक वादळ वार्ता पाटेगाव/चैताली औटे

वाळूज महानगर शासकीय नोकरीचे स्वप्न उराशी बाळगून अकॅडमी प्रवेश घेतलेल्या तरुणीस अपमान वागणूक मिळाली याशिवाय तिचा छळ केला जात असल्याने टोकाचे पाऊल उचलत तिने गळफास घेतल्याची घटना मंगळवारी घडली या प्रकरणी मयत तरुणीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गरुड झेप अकॅडमीच्या संचालकासह पाच जनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
लीना श्रीराम पाटील (वय वर्ष १९) रा, सावखेडा तालुका ,पाचोरा जिल्हा जळगाव या तरुणीने दीड वर्षांपूर्वी बजाजनगरातील पोलीस व सैन्य भरतीचे प्रशिक्षण देणाऱ्या गरुड झेप अकॅडमी प्रवेश घेण्यासाठी आली होती या अकॅडमी प्रवेश घेण्यासाठी लीना हिच्या पालकांनी तीन टप्प्यात १ लाख २० हजार रुपये भरण्याची तयारी दर्शवली यात प्रशिक्षण शुल्क खानावळीचे प्रतिमहा ४ हजार ५०० च्या खर्चाचा समावेश ही तयारी दर्शविल्याने या अकॅडमी तिला प्रवेश देण्यात आला होता प्रवेश घेतल्यानंतर लीना गरुडझेपच्या वस्तीगृहात इतर प्रशिक्षणार्थी मुलींसोबत राहत होती दरम्यान प्रवेश घेतल्यानंतर या अकॅडमी व खानावळीचे शुल्क भरण्यास विलंब झाला यानंतर तिला मानसिक त्रासाने ती नाराज झाली होती, तेव्हा लीनाचा मला फोन यायचा व ती सांगायची की पप्पा मेसचे पैसे नियमित भरत जा इकडे पैसे भरले नाही तर नाश्ता सुद्धा देत नाहीत हे प्रशिक्षण खूप अवघड आहे पैसे भरले नाही तर निलेश सोनवणे सर हे मानसिक त्रास देऊन अपमानास्पद वागणूक देऊन बाकीच्या मुलांमध्ये अपमान करतात तसेच मला रंगावरून एक काळी असे म्हणून हिणवतात, मला येथे शिकायचे नाही असे ती रडून सांगत असे मात्र तिची आम्ही समजून काढत होतो तसेच लीनाने आत्महत्या केल्यानंतर सुद्धा संस्था चालक निलेश सोनवणे ,सुरेश सोनवणे, व्यवस्थापक राठोड, शुभम गोंगे, वार्डन मीरा सत्वधर यापैकी कोणीही मला व माझ्या नातेवाईकांना घटनेची माहिती दिली नाही शारीरिक व मानसिक त्रास दिला तिला आत्महत्या करण्यास प्रवर्त केले असा आरोपही फिर्यादीने केला आहे यावरून वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे,




दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )